रंगभूमीच्या पहिल्याच अंकात (ऑगस्ट १९०७) संपादकांनी महाराष्ट्राड्मयाबद्दलच्या अनास्थेचा उल्लेख केला होता. नंतर या चवथ्या वर्षाच्या पहिल्याच अंकात 'महाराष्ट्रवाङ्मयाचे मन्वंतर (पृष्ठ १ ते ८) असे एक टिपण लिहिले आहे. वर्तमानपत्राच्या धंद्यावर वाईट परिणाम (५) झाल्यामुळे मासिके व पुस्तके निघू लागली हे मन्वंतर आहे. पुस्तके विकत घेऊन वाचणारा वाचकवर्ग नाही. वाचकांना बुद्धिला शीण नको असतो त्यामुळे चांगल्या पुस्तकांचा खप नाही तरीही लेखक लिहितात हे मन्वंतर आहे असे मत व्यक्त केले आहे. यावरून कोणत्याही काळात चांगल्या गोष्टीबद्दल ओरडच असते असे दिसते. लोकांना पुस्तके विकत घ्यायला नको असते हा आजचा अनुभव ऐंशी वर्षापूर्वीही येत होता.

चवथ्या वर्षाच्या सहाव्या अंकात (रंगभूमी, जून १९११ पृष्ठ १ ते ८) 'हिंदुस्थानचे बादशाहा पाचवे जार्ज यांचे राज्यारोहण या शीर्षकाखाली संपादकांचा मजकूर आहे. पाश्चात्यांनी या कलेला प्रतिष्ठा दिल्यामुळे आपल्याकडेही दृष्टिकोन बदलू लागला हे ऋण या लेखात व्यक्त केले आहे.

रंगभूमी नियतकालिकाला पाच वर्षे पूर्ण झाली. त्याचा आढावा, (रंगभूमी, वर्ष ६वे, अंक १ ला १९१४, पृष्ठ १ ते ८) घेताना संपादकांनी त्या काळाच्या दृष्टीने नाटक धंद्यावर आलेल्या संकटाचा उल्लेख केला आहे. गेली दोन वर्षे नाटक धंद्याला वाईट गेली. नाटक मंडळ्यांमध्ये फाटाफूट झाली हे नमूद करून करमणुकीच्या साधनात सिनामोटोग्राफची भर पडली आहे याकडे लक्ष वेधले आहे. सिनेमा म्हणजे वाईट वर्तणुकीचा वस्तुपाठच असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

कोणीही व्यक्ती कितीही दूरदर्शी असली तरी कालमानानुसार घडणाऱ्या घटनांचा अचूक अन्वयार्थ तिला लागतोच असे नाही असे या विधानावरून दिसते. सिनेमा या करमणुकीच्या नव्या साधनाचे परिणाम, लोकमानसात तिचे स्थान याबद्दलचे अंदाज वर्तविणे त्याकाळी कठीणच होते पण सिनेमाशी स्पर्धा करण्यासाठी नाटकधंद्याने काय केले पाहिजे याचा सखोल ऊहापोह करणे शक्य आणि आवश्यकही होते पण तो मात्र येथे केलेला आढळत नाही.

इंग्रज रियासतीत नाटक मंडळींना राजाश्रय नाही. अशात-हेचे खाते निर्माण करावे आणि प्रत्येक गव्हर्नरने एखादा नाट्यप्रयोग पाहण्याचा उपक्रम करावा अशी सूचना केली आहे. कलेच्या विकासाला राजाश्रय आवश्यक आहे असा विचार यातून व्यक्त होतो. याच अंकात रंगभूमी नियतकालिकाबाबतचे गैरसमज सांगून त्यांचे निराकरण केले आहे. रंगभूमी नियतकालिकात किर्लोस्कर नाटक मंडळीकरीत असलेल्या नाटकांवरच लेख येतात अशी टीका होते पण ती पूर्णपणे चुकीची आहे असे संपादकांनी सांगितलेले आहे.

नाटकमंडळ्यांच्या बाबतीत रंगभूमीत वेगवेगळ्या संदर्भात खूप मजकूर आलेला आहे. वर्ष ६वे अंक ४था १।११।१९१४ पृ. ३३ ते ४६ या ठिकाणी रंगभूमिकारांनी धंदेवाईक नाटकमंडळ्यांच्या रचनेसंबंधी स्वत:चे विचार व्यक्त केले आहेत. श्री. नातू व श्री. साठे यांचे निबंध रंगभूमीत प्रसिद्ध झाले होते त्या निबंधांचा तुलनात्मक विचार संपादकांनी मांडला आहे.

रंगभूमी नियतकालिकाची नवी आवृत्ती एप्रिल १९२७ पासून निघू लागली. यावेळेपर्यंत श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांचा किर्लोस्कर संगीत मंडळीशी असलेला संबंध दुरावला होता. रंगभूमी नियतकालिकाच्या आश्रयदात्यांना या अंकात विनंती करताना संपादकांनी जाणीव दिली आहे की रंगभूमी मासिक हा नाट्यविषयक वाङ्मयाचा महाराष्ट्र-भाषेत प्रसार करण्याचा पहिला प्रयत्न आहे. या मासिकाकडे नव्या आश्रयदात्यांनी करमणुकीच्या दृष्टीने न पाहता एका मलिन झालेल्या उच्च वर्गातल्या कलेला पुन: उज्ज्वल स्वरूप आणावयाचे आहे या उद्देशाने पाहावे. रंगभूमीच्या या नवीन आवृत्तीच्या पहिल्या अंकातOnce More (पृ. १ ते १६) या शीर्षकाखाली संपादकांनी आपले नाट्यविषयक चिंतन प्रगट केले आहे रंगभूमी मासिक सात वर्षे चालून बंद पडल्यावर त्याच्या जागी दुसरे कोणते नाट्यविषयक मासिक निघाले नाही या वस्तुस्थितीकडे संपादकांनी लक्ष वेधले आहे. महाराष्ट्रस्त नाट्यकलेला योग्य अशी जागा अद्याप मिळावयाची आहे असे सांगून त्यांनी स्वत:च्या जुन्या उद्‌गारांची आठवण करून दिली आहे. जुलै १९०८ च्या अंकात 'सिंहावलोकन करताना असे उद्‌गार काढले होते की, रंगभूमीवर ज्यांचे जीवन अवलंबून आहे तो वर्ग नाट्यकलेच्या सुधारणेविषयी उदासीन आहे. या स्थितीत १९२७ मध्येही फरक नाही असे मत येथे व्यक्त केले आहे. समाजात अनेक बाबतीत सुधारणा झाल्या पण नाटक या विषयात सुधारणा झाली नाही. पुढे नट आणि नाटककार यांच्या संदर्भात मननीय विचार मांडलेले आहेत. नाटककार श्रेष्ठ की नट श्रेष्ठ नाटकाच्या यशाचे श्रेय कोणाकडे जाते अशासारखे विषय

आजही चर्चिले जातात. याबाबत रंगभूमिकारांनी आपले मत असे दिले आहे की नटवर्गाच्या गुणांचे अर्धे श्रेय कवीच्या शब्द, वाक्य किंवा पद्य रचनेकडे विशेष जाते म्हणून कवी व नटवर्ग साम्यतेचे पाहिजेत. म्हणजे नाटककार आणि नट सारख्याच तोलामोलाचे असायला हवेत असे संपादकांना म्हणावयाचे आहे. पण त्याकाळची परिस्थिती मात्र वेगळी होती. तिचे वर्णन करताना संपादक सांगतात, कवीच्या कृतीला दिपवून आपला प्रभाव पाडणारे नट विशेष योग्यतेचे समजले जातात. शेक्सपीअरची महती ग्यारिकच्या नाट्यकौशल्याने जगाच्या निदर्शनाला आली असे इतिहासकार सांगतात, पण आज मात्र नटांच्या धंदेशिक्षणाची काहीही सोय नाही ते केवळ पोपटपंची करतात. संगीतावर नाटक मारून नेतात आणि नाटक रंगभूमीवर आले म्हणजे नटांचे उपकार असे नाटककार समजतात. नाट्यसृष्टीचे हे स्वरूप बदलण्याचा मार्ग म्हणजे वर्तमानपत्रात जशी अनेक सामाजिक विषयांवर चर्चा चालते तशी रंगभूमीच्या सद्य:स्थितीवरही चर्चा चालू राहावी.

या विवेचनावरून स्पष्ट आहे की नाटककारापेक्षा नटांना मोठे मानण्याचा तो काळ होता. नाटककार नटांचे उपकार मानीत होते. म्हणजे प्रयोगमूल्य ध्यानात घेऊन, नटवर्ग डोळ्यापुढे ठेवून नाट्यलेखन होत होते. पण ज्या नटवर्गावर या कलेची, व्यवसायाची एवढी भिस्त होती त्यांना मात्र कसलेच पद्धतशीर शिक्षण नव्हते ही गोष्ट श्री. मुजुमदार यांना प्रकर्षाने जाणवत होती. नाटकमंडळ्यांना आश्रय देणाऱ्या राजे व संस्थानिक मंडळींनी, नाटकमंडळींच्या सामाजिक व व्यवहारशिक्षणासंबंधी निर्बंध घालावेत म्हणजे हा धंदा, कला या नावाला पात्र होईल अशी योग्य सूचना त्यांनी केली आहे. नाटकमंडळ्यांना जे आश्रय देतात त्यांना नाटकमंडळ्यांत काय चालते ते माहीत नसते हे वाईट आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. याचा अर्थ राजे लोक किंवा संस्थानिक यांचा आश्रय फक्त आर्थिक जोरावर होता. त्यांच्यात रसिकता, गुणग्राहकता होती हे खरे, पण नाट्यकलेच्या विकासाची तळमळ किंवा कला, धंदा यादृष्टीने समजही फारशी खोल नसावी.

याच विवेचनात नाट्यकलेच्या इतिहासाचा थोडक्यात आढावा घेऊन, नाट्यसृष्टीत काही उच्च ध्येय मनात धरून नाट्यकलेची सेवा करणाऱ्यां पुण्यातील संस्थांचा उल्लेख केला आहे. त्यात सोशल क्लब व महाराष्ट्र नाटक मंडळीचा उल्लेख आहे.

रंगभूमी नियतकालिकाचे वेळोवेळी सिंहावलोकन करताना संपादकांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाविषयी आणि नाट्यक्षेत्राविषयी बरेच लिहिले आहे. त्याचप्रमाणे

स्फुटविवेचनातही आपली मते मांडली आहेत. याखेरीज काही नाटकांवर त्याचप्रमाणे इतरांनी लिहिलेल्या नाट्यविषयक लेखांवर संपादकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. उदा. श्री. गो. वा. बापट यांनी रंगभूमी नियतकालिकात शाकुन्तल व उत्तररामचरित या नाटकांवर विस्तृत लेख लिहिले त्याचा परामर्ष संपादकांनी घेतला आहे. कीचकवध आणि इतर काही मराठी नाटकांवर अधूनमधून त्यांनी लिहिले आहे त्याचा विचार प्रस्तुत प्रबंधात त्या प्रकरणात येईल. पण ' शादीकी पहिली रात या हिंदी नाटकावर ऑक्टोबर ।नोव्हें ।डिसें १९२७ अंक ७ ।८ ।९ मध्ये संपादकीय लिहिले आहे ते महत्त्वाचे आहे. या नाटकाचा परामर्ष प्रबंधात इतरत्र येणार नसल्याने आणि यावरील संपादकीय टीकाटिप्पणी महत्त्वाची वाटल्याने त्याचा विचार येथे कला आहे.

शादीकी पहिली रात हे नाटक नोव्हें १९२७ मध्ये नाट्यकला प्रवर्तक मंडळीने पुण्याच्या रंगभूमीवर आणले. नाटकाचा विषय स्पर्शजन्य रोगाचा समाजात होणारा फैलाव हा होता. त्याचे लेखक श्री. मुन्शी होते. या नाटकावरील अभिप्राय, वरील अंकात, ' लिहून आलेला मजकूर याखाली छापला आहे आणि लगेच पुढे संपादकीय लिहिले आहे. 'लिहून आलेला मजकूर निनावी आहे.

संपादकीय मध्ये या नाटकाच्या संदर्भात खालील मुद्दे मांडलेले आहेत. -

१. महाराष्ट्रीय नाटककारात कल्पकता कमी प्रमाणात असते. उडदू (उर्दू-हिंदी) नाटककारात ती अधिक प्रमाणात असते मात्र तीत सदभिरुची नसते.

२. उडदू नाटकात जी कल्पकता असते ती हास्यरसाच्या संविधानकात असते. अश्लीलता, असभ्यपणा, कथानकाशी संबंध नसणे हेच या हास्यरसाचे प्रधान अंग असते.

३. नाटकातील मुख्य कथाभागात - हास्यरसाचा भाग सोडून मनुष्यस्वभावाची आखणी कोठेच बरोबर झाली नाही.

४. स्थल, काल, कृती यांचा मेळ घालून हे नाटक लिहिलेले नाही.

५. नाटकाचा प्रयोग मेहनत घेऊन बसविलेला आहे. कामे चांगली होतात पण काही नट, प्रेक्षक जणु आपल्यातीलच पात्रे आहेत अशा समजुतीने प्रेक्षकांना आपल्या सल्लामसलतीत घेतात. त्यांना (प्रेक्षकांना) उद्देशून भाषण करण्याची काही पात्रांची (नटांची) खोड दिसली. हे नाट्यशास्त्रदृष्ट्या अशास्त्र आहे ही कल्पना पात्रांना नसते म्हणा किंवा प्रेक्षकांना हसविण्याकरिता त्यांना हे करावे लागते म्हणा, परंतु हा अभिनयाचा भाग नाही एवढे खरे.

महाराष्ट्रीय नाटककारात कल्पकता कमी प्रमाणात असते हा विचार श्री. कृ. कोल्हटकर, राम गणेश गडकरी यांच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे. या दोन मराठी नाटककारांनी पारसी, उर्दू नाटकांच्या संविधानकांवरून बरीच स्फूर्ती घेतली पण स्वत:जवळ कल्पनाचातुर्य नसते तर ते प्रभावी नाटके लिहू शकले असते का त्यांच्या नावांचा नुसता उल्लेखसुद्धा येथे का नसेल या दोघांचा किर्लोस्कर नाटक मंडळीशी, श्री. मुजुमदार यांच्याशी, रंगभूमी नियतकालिकाशी संबंध दुरावला होता हे तर कारण नसेल इ.स. १९२७ पर्यंत गडकरी हयात नव्हते पण श्री. कृ. कोल्हटकर हयात होते. कोल्हटकर व गडकरी या दोघांचे नाट्यकर्तृत्व सिद्ध झालेले होते. या दोघांच्या लेखनातील कल्पनाप्राचुर्याची दखल घ्यायला हवी होती. कल्पनावैभव हा या दोघांच्या नाट्यप्रतिभेचा विशेष होता. हिंदी नाटकातील कल्पकतेचा सभ्यतेशी, सुसंस्कृतपणाशी संबंध नसतो तो असायला हवा असे सूचित केले आहे. यातून कलेचा नीतिमत्तेशी असलेला संबंध संपादकांनी मान्य केला आहे. त्या काळातले ते एक मूल्य होते यादृष्टीने हा विचार लक्षात घेण्याजोगा आहे. नाटकात व्यक्तिचित्रण व्यवस्थित असावे आणि स्थल, काल, कृती यांचा मेळ साधला गेला पाहिजे. ही दोन्ही तत्त्वे इंग्रजी नाट्यसमीक्षेतून मराठीत आलेली होती. तोच प्रभाव येथे स्पष्ट दिसतो. पण भारतीय नाट्यशास्त्रही मनावर पक्के बिंबलेले आहे. नाट्यप्रयोगात नटांनी प्रेक्षकांशी बोलणे नाट्यशास्त्राच्या दृष्टीने चुकीचे आहे. याला अभिनय म्हणत नाहीत असे मत व्यक्त केले आहे. तत्कालीन विचारवंतांची विचारपद्धती, अभिरूची पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन समीक्षापद्धतींच्या संमिश्रणांतून घडलेली होती असे या विचारांवरून दिसते. दोन्ही नाट्यलेखनपद्धती, नाट्यप्रयोगपद्धती यांचा मेळ घालून, भारतीय मूल्ये जोपासून नाट्यकला उभी राहावी अशाप्रकारच्या अपेक्षा दिसतात. आज, प्रेक्षक हा रंगमंचव्यवहारातला एक घटक आहे. नाट्यानुभवात त्याला सामील करून घेण्यास काहीच हरकत नाही असे विचार मांडले जातात इतकेच नाही तर अधूनमधून तशी कृती घडते या पार्श्वभूमीवर त्रेसष्टवर्षांपूर्वीचे हे विचार अर्थातच कालमानानुरूप होते एवढेच म्हणावेसे वाटते.

हिंदी नाटकामधील या वेगळेपणाची दखल घ्यावीशी वाटली ही गोष्ट सूक्ष्म विचारशक्तीची द्योतक आहे अणि ती महत्त्वाची आहे.

रंगभूमी नियतकालिकाकडून वाचकांच्या अपेक्षा

रंगभूमीत वर्ष १ ले अंक १ ला पत्रव्यवहार पृ. १ ते ४ मध्ये स.ह.भावे यांनी रंगभूमी नियतकालिकाकडून कोणत्या अपेक्षा आहेत ते विस्तृतपणे सांगितले आहे. नाट्यविषयक नियतकालिक कसे असावे. यासंबंधी पत्रलेखकाने सूक्ष्म विचार केलेला दिसतो. नाट्यविषयक जाणही चांगली आहे यावरून रंगभूमी नियतकालिकाच्या कार्यात रस घेणारे, प्रगल्भ दृष्टिकोन असलेले वाचक सुरुवातीपासून मिळालेले दिसतात. श्री. स. ह. भावे यांच्या लेखनात आलेले मुद्दे खालीलप्रमाणे-

१. रंगभूमी नियतकालिकात, रंगभूमी म्हणजे काय ते सांगून मराठी रंगभूमीचा इतिहास यावा. तो तज्ञांकडून नि:पक्षपातीपणाने लिहवून घ्यावा.

२. प्रत्येक नाटकमंडळीतील कुशल नटांची नट म्हणून आणि व्यक्ती म्हणून चरित्रे या नियतकालिकात यावीत.

३. प्रेक्षकांकरिता चांगली जागा (थिएटर-प्रेक्षागृह) कशी असावी, पूर्वी कशी होती, त्यात काय सुधारणा हव्या आहेत,त्या करण्यामधील अडचणी कोणत्या आहेत याचा विचार यावा.

४. पात्रे रंगविण्याच्या कामातील उपकरणांसंबंधीचा विचार यावा.

५. ऐतिहासिक माहितीनुरूप वस्तुस्थितीला धरून नटांचे नेपथ्यात काय सुधारणा व्हाव्या याचा विचार मांडावा.

६. रंगभूमीचा आकार, लांबीरुंदी, पडदे, त्यांची मांडणी, पात्रांच्या जाण्यायेण्याची व्यवस्था यासंबंधीची माहिती आणि नवे विचार यात यावेत.

७. अभिनय म्हणजे काय याचे शास्त्रदृष्ट्या पृथक्करण व विवेचन करावे.

८. नाटक मंडळ्या प्रवास कशा करीत, त्यांची निरनिराळ्या गावी राहण्याची, बिऱ्हाडाची, जेवणखाण्याची कशी सोय होत असे व आता कशी व्हावी ते सांगावे.

९. नाट्यकलेचा मुख्य उद्देश मनोरंजन हा असला तरी त्या मनोरंजनाचे आत अंत:करणास जास्त उच्च बनविणारे, मनास अधिक सुसंस्कृत करणारे, मेंदूस उत्तेजित करून बुद्धीस विशालत्व आणणारे गुण असले पाहिजेत हे तत्त्व वाचकांचे मनावर ठसेल अशा तऱ्हेचे प्रतिपादन रंगभूमी पुस्तकात यावे.

१०. नाटकमंडळ्यांचा इतिहास कालानुक्रमाने द्यावा. प्रत्येक नाटकमंडळी कोणकोणती नाटके करीत असे त्याची यादी द्यावी. त्या त्या काळी त्या नाटकांची लोकप्रियता कशी होती, नाटककार कोण होते, नाटक बसवून देणारे कोण होते इ. माहिती यावी.

११. नाटकासंबंधीच्या आख्यायिका नाटक चालले असताना झालेल्या गमती प्रेक्षकांच्या वर्तनाची तऱ्हा, पात्रांचे प्रसंगावधान, पात्रांची लोकप्रियता कोणत्या गुणावर अवलंबून आहे, एकदा अत्यंत प्रिय झालेली पात्रे नंतर अप्रिय का झाली व का होत आहेत याचा विचार रंगभूमी या पुस्तकात झाला पाहिजे.

१२. महाराष्ट्र रंगभूमीच्या अगदी प्राथमिक अवस्थेपासून तो सद्य:स्थितीपावेतो इतिहास – त्यातील सर्व अंगोपांगांच्या यथास्थित विचारांसह दिला पाहिजे. नाट्यविषयक बाहेरील माहिती पुष्कळ असावी. जुन्यातील त्याज्य भाग सोदाहरण सिद्ध करून नवीन तयारी कशी करावी ते दाखवावे. नाटकांस जास्त उदात्त, रसाळ, प्रेमळ, मनोहर स्वरूप कसे आणावे. त्यास योग्य वळण कसे लावावे हे चांगले दाखवावे.

१३. रंगभूमी विषयी लिहिणारा लेखक स्वत: उत्कृष्ट नाटककार, सरस नाटके शिकविणारा किंवा उत्तम नाटके करूनदाखविणारा (नट) असावा. किंवा या विषयातील रसिक, बहुश्रुत, व्यासंगी असावा.

या सर्व मागण्यांवरून वाचकांच्या विशेषत: अभ्यासू वाचकांच्या रंगभूमी नियतकालिकाकडून किती खोलवर ज्ञानाच्या अपेक्षा होत्या हे लक्षात येते. रंगभूमी नियतकालिक करमणुकीसाठी नाही तर नाटक या करमणूक करणाऱ्या कलाप्रकाराला उन्नतावस्था कशी येईल याचा सर्वांगीण विचार मांडणारे नियतकालिक आहे, असावे. अशी स्पष्ट जाणीव या अपेक्षांमधून व्यक्त होत आहे.

रंगभूमी वर्ष ४ थे एप्रिल १९११ अंक ४ मध्ये पत्रव्यवहार या सदरात रंगभूमीचा वर्गणीदार व नाटकवाला एक 'क्ष या स्वाक्षरीने आलेले एक पत्र छापले आहे. हे पत्र पालकोंडा येथून २१।१२।१९१० ला लिहिलेले आहे. या पत्रात पत्रलेखक 'क्ष लिहितो की '' आजपर्यंत 'रंगभूमी त प्रसिद्ध झालेले नाटकविषयक व संमेलनविषयक सर्व लेख वाचले पण त्यापासून व्हावे तसे समाधान झाले नाही म्हणून काही प्रश्न पुढे ठेवीत आहे.' नाटक संस्था टिकाऊ कशाने होतील या संदर्भात पत्रलेखकाने रंगभूमीच्या संपादकांना सहा प्रश्न विचारले आहेत व त्यांची उत्तरे त्यांनी द्यावीत असे सुचविले आहे. संपादकांनी सर्व प्रश्नांची उत्तरेही लगेच छापली आहेत. प्रश्न खालील प्रमाणे आहेत. -

१) नाट्यसमाज हा टिकाऊ होण्यास तो भागीदारांचा असणे योग्य की पगारदारांचा असणे योग्य

२) भागीदारांचा समाज टिकाऊ असेल तर त्याची कारणे कोणती व पगारदारांचा समाज टिकाऊ असेल तर त्याची कारणे कोणती

३) नाटक मंडळी घेऊन गावोगाव फिरण्यास भागीदार मंडळ सोयीचे की पगारदार मंडळ सोयीचे

४) रंगभूमीवर भागीदार मंडळीने केलेला प्रयोग व पगारदार मंडळीने केलेला प्रयोग यात काही फरक दिसेल काय

५) रंगभूमीवर प्रयोग करून दाखविण्यास प्रोज व संगीत यापैकी सोपा व सोयीचा कोणता व त्याची कारणे कोणती

६) नाटक मंडळीतील प्रत्येक नटाचे खाजगी वर्तन व बाहेरचे लोकसमाजातील वर्तन हे कोणत्या प्रकारचे असावे व त्या वर्तनाच्या बरे-वाईटपणाचा नाटक प्रयोगावर काही परिणाम होतो काय होत असल्यास कशाप्रकारचा

पत्रलेखक 'नाटकवाला असल्याने त्याने नाटक मंडळीबाबत प्रश्न विचारलेले दिसतात. संपादकांचा नाटक मंडळीच्या व्यवहाराशी घनिष्ट संबंध होता व त्यामुळे त्यांचे विचार व मते पत्रलेखकाला महत्त्वाची वाटलेली दिसतात. रंगभूमीत प्रसिद्ध झालेले नाटकविषयक व संमेलनविषयक लेख असमाधानकारक का वाटले कोणत्याबाबतीत असमाधानकारक वाटले ते मात्र येथे सांगितलेले नाही. पत्रलेखकाने विचारलेले प्रश्न नाटक मंडळी या एकाच विषयाबाबतचे आहेत. रंगभूमी नियतकालिकाचे व्यापक स्वरूप या पत्रलेखकाने लक्षात घेतलेले दिसत नाही. पण प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केलेला असला तरी संपादकांनी हे पत्र छापून त्यातील प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत.

रंगभूमी वर्ष ६ वे अंक २ रा दि. २१-७-१९१४ मध्ये पत्रव्यवहार या सदरात, ''रंगभूमी (मासिक) कोणा करता हे नगरच्या एका नटाने दि. २१-५-१९१४ रोजी पाठविलेले पत्र छापले आहे. रंगभूमीत जुन्या नटांची माहिती येते. त्यात, त्यांचे श्रेष्ठत्व कशात होते ते त्यांनी कसे मिळविले त्यांचे गुरु कोण इ. माहिती द्यावी ही अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे जोशी, बापट, प्रधान, कारखानीस, बोडस इ. चांगले नट आहेत त्यांचीही माहिती द्यावी अशी मागणी करून नटांकरता आपण काय करता ते सांगा. असा'रंगभूमी कारांना प्रश्न विचारला आहे.

रंगभूमी नियतकालिकाकडे, त्यांच्या संपादकांकडे त्या क्षेत्रातील वेगवेगळ्या माणसांचे, वेगवेगळ्या दृष्टीने कसे लक्ष होते ते या पत्रांवरून दिसते. रंगभूमीसारख्या प्रौढ, गंभीर नियतकालिकाची दखल घेतली जात होती. वाचक वाचीत होते, मते व्यक्त करीत होते हे त्या काळच्या मानाने खूप गौरवास्पद आहे. कारण नाटक या विषयाची गंभीर चर्चा ही तत्कालीन समाजाच्या अंगवळणी पडलेली गोष्ट नव्हती म्हणून वाचकांच्या पत्रव्यवहाराचे मोल विशेष आहे.

रंगभूमी नियतकालिकातील लेखांचे वर्गीकरण आणि थोडक्यात तपशील

रंगभूमी नियतकालिकात नाटक या वाङ्मयप्रकाराचा सर्वांगीण विचार आहे. त्यामुळे या विषयाच्या अनेक पैलूंचा विचार विविध प्रकारांनी यात झालेला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी या लेखांचे वर्गीकरण केले की यातील नाट्यविचाराची व्यापकता ध्यानात येते म्हणून हे वर्गीकरण आणि त्यातील एकेका प्रकारचा थोडक्यात परिचय या ठिकाणी दिला आहे. रंगभूमी नियतकालिकातील लेखांची समग्र सूची या प्रकरणाच्या शेवटी परिशिष्टात दिलेली आहे त्यावरून संपूर्ण तपशील डोळ्यापुढे येतो.

(१) नाटकविषयक लेख :

रंगभूमी नियतकालिकाचा बराच मोठा भाग अर्थातच नाटक विषयक लेखांनी व्यापलेला आहे. नाटक या वाङ्मयप्रकाराचा आणि एकूण नाट्यव्यवहाराचा विचार किती विविध बाजूंनी करता येतो, करणे आवश्यक आहे हे या लेखांनी प्रथमच एकत्रितपणे दाखवून दिले असे म्हणावयास पाहिजे. यापैकी काही लेख हे तात्त्विक चर्चा करणारे आहेत. उदा. नाट्यकलेची उत्पत्ती, नाट्यकलेचे ललितत्त्व, नाटकाची घटना, नाटकविषयक व्यापक विचार अशांसारख्या लेखांमध्ये नाटक एक स्वयंपूर्ण कलाप्रकार या दृष्टीने महत्त्वाचे विचार मांडलेले आहेत. नाटक हा दृक्श्राव्य कलाप्रकार असल्याने त्याच्या प्रयोगमूल्याचा विचारही महत्त्वाचा ठरतो हे प्रयोगमूल्य एका बाजूने नाट्यसंहितेशी निगडित असते तर दुसऱ्या बाजूने नाटक मंडळी, नट, नाट्यशिक्षक (आजच्या भाषेत दिग्दर्शक) प्रेक्षक, रंगमंचव्यवस्था, नाट्यगृह हे सारे घटक नाट्यप्रयोगाचे भवितव्य ठरवीत असतात. म्हणूनच त्यासंबंधीची तत्कालीन परिस्थिती, गुणावगुण यांची चर्चा करणारे लेख हा नाटक विषयक लेखांचाच दुसरा भाग आहे. नाटक मंडळ्यांच्या फाटाफूटीचा नाटक धंद्यावर होणारा परिणाम, नटांच्या शिक्षणाची गरज, प्रेक्षकांचे प्रेक्षागारातील वर्तन, त्यांची अभिरुची, असे विषय या लेखात हाताळलेले दिसतात. तिसरा प्रकार विनोदी आणि उपहासपूर्ण लेखांचा. नाटक कसे लिहावे प्रमादपंचदशी, नाट्यकलारूक्कुठार इ. स्वरूपाचे लेख यात येतील. अशारीतीने

नाट्यलेखन हा एक कलाप्रकार, प्रयोगरूपाने त्याची उभारणी करताना त्यात अंतर्भूत असलेले घटक, ज्यांच्यासाठी हा सारा खटाटोप त्या प्रेक्षकांची अभिरुची या सगळ्याच गोष्टी नाट्यव्यवहारात महत्त्वाच्या असतात. म्हणून त्याची विस्तृत चर्चा रंगभूमी नियतकालिकात आलेली आहे.

(२) नाट्यपरीक्षणे

नवीन नाटकांवर अभिप्राय देणे, त्यांच्या प्रयोगांची परीक्षणे लगेच लिहिणे ही त्या त्या काळातली एक गरज असते. या परीक्षणांवरून वाचकांना, प्रेक्षकांना नाटकाचा अंदाज येतो. रंगभूमी काळात बरेचदा आधी नाटकाचा प्रयोग आणि मग पुस्तकरूपाने नाटक असे घडत असे त्यामुळे मराठी नाटकांचे प्रयोग पाहून बहुतेक परीक्षणे लिहिली गेलेली आहेत. कीचकवध, बायकांचे बंड, मतिविकार, राष्ट्रोद्धार मोहनतारा, शारदा अशा अनेक नाटकांची परीक्षणे रंगभूमी नियतकालिकात आली आहेत.

मराठी नाटकांबरोबरच संस्कृत, इंग्रजी नाटकांचीही परीक्षणे वाचावयास मिळतात. ही परीक्षणे म्हणजे विस्तृत लेखच आहेत. या काही तात्कालिक प्रतिक्रिया नव्हेत कारण ही संहिता समीक्षा आहे. हे लेख लिहिणाऱ्यांच्या डोळ्यापुढे या नाटकांचे प्रयोग नव्हते. तर संहिता होत्या. संस्कृत आणि इंग्रजी नाटकांच्या इतिहासात स्थिरपद झालेली ही नाटके होती. या नाटकांच्या रूपाने पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही नाट्यधारांचा विचार तत्कालीन विद्वावानांना करावासा वाटला आहे. मराठी नाट्यविचार या दोन्ही प्रवाहांमुळे अधिक सकस झाला आहे. संस्कृत नाटकांपैकी उत्तररामचरित, शाकुन्तल, मृच्छकटिक, नागानन्दम्, मालविकाग्निमित्रम्, मालतिमाधव या नाटकांवर लेख आहेत. तर इंग्रजी नाटकांपैकी रोमिओ अँड ज्यूलिएट, टू जंटलमेन ऑफ व्हेरोना, सिंबेलाइन, मिड्समर नाइट्स डीम्म, या नाटकांवर लेख आहेत.

(३) विविध सदरे

कोणत्याही नियतकालिकात वेगवेगळ्या सदरांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान असते. रंगभूमीत संपादकीय, चुकांची झोळी, पत्रव्यवहार स्फुटविवेचन,स्फुटविचार, सिंहावलोकन काहीतरी विनोद इ. सदरे आलेली आहेत. या सदरांमध्ये स्वत: संपादकांनी खूप लेखन केलेले आहे. त्याचप्रमाणे वाचकांची वेगवेगळ्या विषयाच्या संदर्भातील पत्रे, माहिती, अभिप्राय या सदरांमधून आलेली दिसतात. हा सगळा मजकूर फुटकळ स्वरूपातला असला तरी त्यात विविधांगी विचार आहेत. तत्कालीक प्रतिक्रिया आहेत. प्रयोगातील चुकांचे दिग्दर्शन आहे, रंगभूमी नियतकालिकाबाबत अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. नट, प्रेक्षक यांच्यावर विनोदाच्या माध्यमातून केलेली टीका आहे. तत्कालीन नाट्यविश्वाचे दर्शन या स्फुट विचारातून चांगले घडते.

(४) भारतनाट्यसंमेलनांच्या अध्यक्षांची भाषणे

८ ऑगस्ट १९०५ रोजी दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला पहिले नाट्यसंमेलन भरले. या संमेलनांची मूळ कल्पना श्री. अनंत वामन बरवे यांची होती.६ आपली कल्पना त्यांनी नाशिकच्या 'लोकसेवा या वृत्तपत्रात मांडली आणि त्यातील विचार पटल्यामुळे राजापूरकर नाटक मंडळीचे मालक बाबाजी दौलतराव राणे यांनी एका संमेलनाचा खर्च देण्याची तयारी दाखविली. त्यांच्याच प्रेरणेने मुंबईला १९०५ मध्ये पहिले संमेलन भरले. भारतनाट्यसमाजाची स्थापना झाली तेव्हा श्री. शंकरराव मुजुमदार हे या संस्थेचे चिटणीस झाले. या संमेलनांचे वृत्तांत, काही अध्यक्षीय भाषणातील महत्त्वाचा भाग, संमेलनात इतर कोणी निबंधवाचन केले इ. तपशील रंगभूमी नियतकालिकात सातत्याने आलेला आहे. तत्कालीन नाट्यविषयक परिस्थिती, समस्या यांचे विवेचन आपापल्या अध्यक्षीय भाषणात त्या त्या वेळच्या अध्यक्षांनी केलेले आहे. चवथ्या संमेलनापासूनचे वृत्तांत व अध्यक्षीय भाषणे रंगभूमीत आली आहेत. या वृत्तांतांतून आणि अध्यक्षीय भाषणातून नाट्यक्षेत्रातील गुणदोषांचे, तत्कालीन नाट्यविषयक वातावरणाचे चांगले भान येते.

(५) वृत्तांतलेख

रंगभूमी नियतकालिकात भारतनाट्यसमाजाच्या संमेलनांचे वृत्तांत आलेले आहेत. त्याचप्रमाणे किर्लोस्कर नाटक मंडळीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मंडळीच्या नाट्यविषयक कार्याचा आढावा, वृत्तांतही वेळोवेळी घेतला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात किर्लोस्कर नाटक मंडळीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. या मंडळीने नुसती नाटकेच बसविली नाहीत तर नाट्यविषयक चळवळींची उभारणी केली. नाटकाच्या अभ्युदयासाठी विविध मार्गांनी प्रयत्न केले त्यामुळे हे वृत्तांत मोलाचे ठरतात. किर्लोस्कर नाटक मंडळी नाटके करीत गावोगाव हिंडत होती त्या त्या वेळचे, त्या त्या गावातील प्रेक्षकांचे, सरकारी अधिकाऱ्यांचे अनुभव मंडळीच्या व्यवस्थापकांना नोंदवून ठेवावेसे वाटले आहेत. नाटक धंद्याची मदार किती बारीकसारीक गोष्टींवर असते याचे निरीक्षण, अभ्यास किर्लोस्कर नाटक मंडळीचे मुक्काम या वृत्तांतात दिसतो. म्हणून हे वृत्तांत महत्त्वाचे आहेत.

(६) नट व नाटककार यांची चरित्रे

रंगभूमी नियतकालिकात संपादकांनी लिहिलेली नट व नाटककार यांची चरित्रेही ऐतिहासिक महत्त्वाची आहेत. त्याकाळी हयात असलेले आणि दिवंगत झालेले असे काही नट आणि नाटककार यांच्या विषयीची माहिती या लेखनातून कायमची उपलब्ध झाली आहे. अशाप्रकारच्या लेखनाची आपल्याकडे प्रथा नव्हती. श्री. शंकरराव मुजुमदार नाट्यक्षेत्राशी अनेक प्रकारे जवळून संबंधित होते. त्यामुळे कर्तृत्ववान नट, नाटककारांची त्यांनी लिहून ठेवलेली माहिती ही त्यांची मोठीच कामगिरी मानली पाहिजे.

(७) प्रस्तावना

रंगभूमीत लहानशा पण महत्त्वाच्या अशा तीन प्रस्तावना आलेल्या आहेत. त्या श्री. कृ. प्र. खाडिलकर आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या आहेत. या दोन्ही मातब्बर नाटककारांनी रंगभूमी नियतकालिकात या खेरीज अन्य कोणतेही लेखन मात्र केलेले नाही.

(८) भरताच्या नाट्यशास्त्राचा अनुवाद

प्रो. चिं. गं. भानु यांनी केलेला भरतमुनींच्या मूळ संस्कृत नाट्यशास्त्राचा मराठी अनुवाद रंगभूमी नियतकालिकात क्रमश: प्रसिद्ध झाला आहे. भरताचे नाट्यशास्त्र त्यांनी प्रथमच मराठीत आणले आहे. या दृष्टीने हे लेखन महत्त्वाचे आहे.

(९) नाट्यसंहिता

राम गणेश गडकरी यांचे 'वेड्यांचा बाजार' हे प्रहसन आणि कृ. आ. गुरुजी यांचे 'संगतिपरिणाम नाटक' या दोन संहिता प्रथम रंगभूमीत क्रमश: प्रसिद्ध झाल्या आहेत. 'शारदा' नाटकातील काही अप्रसिद्ध प्रवेशही प्रसिद्ध केले आहेत.

(१०) याद्या - (सूची)

रंगभूमीत वेळोवेळी काही याद्या किंवा सूची प्रसिद्ध केल्या आहेत त्या उपयुक्त आहेत. शेक्सपीअरच्या नाटकांची संपूर्ण यादी, संस्कृत नाटकांची यादी, रंगभूमीत प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या, चित्रांच्या याद्या इ. मुळे एकत्रित, सलग माहिती मिळते.

(११) मराठीतर रंगभूमी विषशयक लेख

बंगाली, गुजराती रंगभूमीच्या स्वरुपाची कल्पना देणारे लेख रंगभूमी नियतकालिकात आले आहेत. पाश्चात्य रंगभूमीवरही लेख आहेत. तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्टीने हे लेख उपयुक्त आहेत.

(१२) संकीर्ण

काही नाट्यविषयक फुटकळ स्वरूपाचे तर काही अन्य विषयावरील लेख रंगभूमीत आलेले आहेत. नोंद म्हणून त्यांची *दखल घेणे आवश्यक आहे.*

समारोप

रंगभूमी नियतकालिकाचे अंतर्बाह्य स्वरूप आणि वैशिष्ट्य या प्रकरणात स्पष्ट केले. या प्रकारचे नियतकालिक सुरू करण्यामागील आणि ते तोटा सोसून चालविण्यामागील ध्येयवादी दृष्टी संपादकीय विवेचनातून, निवेदनातून दिसते. मराठी नियतकालिकांच्या इतिहासात नाटक या एकाच विषयाशी संबंधित असे हे पहिलेच नियतकालिक आहे. नाटक या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने विचार केला तर अशा तऱ्हेचे नियतकालिक सुरू करण्याला काळ काही फारसा अनुकूल नव्हता. रंगभूमी नियतकालिकपूर्व काळात नाट्यविषयक लेखन भरपूर झालेले होते पण नाटक हा वाङ्मयप्रकार, नाटकप्रयोग, नाटकधंदा हे सारे जनसामान्यांच्या अंत:करणातील जिव्हाळ्याचे विषय अजून झालेले नव्हते. परकीय सत्ता, राजकीय चळवळी, राजकीय खटले, महायुद्ध, प्लेगची साथ, समाज-सुधारणांच्या संदर्भातील मत-मतांतरे व चळवळी अशा अनेक घडामोडींनी गजबजलेला कालखंड हा रंगभूमी नियतकालिकाचा कालखंड आहे. पण याच काळात प्रतिभावंत नाटककारांनी नाट्यक्षेत्रात सुवर्णयुग निर्माण केले आहे. महाराष्ट्रला दोन गोष्टींचे वेड आहे. एक राजकारणाचे व दुसरे नाटकाचे असे म्हटले जाते. या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्नही या काळात झाला.

ज्या काळात 'केसरी हा जनतेच्या गळ्यातला ताईत होता, ज्या केसरीकारांनी किर्लोस्कर नाटक मंडळीला आशीर्वाद दिले, नानासाहेब जोगळेकरांसारखे नट मिळवून दिले, नाटकांच्या जाहिराती छापल्या, त्या 'केसरी त रंगभूमी नियतकालिकाच्या जन्माची बातमी नाही. ऑगस्ट १९०७ मध्ये हे नियतकालिक सुरू झाले. त्याच्या आसपास केव्हातरी या नियतकालिकाबाबत, त्याच्या संपादकांबाबत 'केसरी त काही मजकूर यायला हवा होता. मधे खंड पडून १९२७ मध्ये या नियतकालिकाची नवी आवृत्ती निघाली तेव्हा त्याचा उल्लेख आणि संपादक श्री. शंकर बापूजी मुजुमदार आहेत ही बातमी 'केसरी त आली आहे. ('केसरी ९ ऑगस्ट १९२७, कॉलम २ रा, पृ. १३) यावरून लक्षात येते की नाटक हा अनेक विषयांपैकी एक विषय गणला जात होता. वृत्तपत्राच्या बाबतीत तर हे अपरिहार्यच आहे पण एक वैशिष्ट्यपूर्ण घटना म्हणून समकालीन वृत्तपत्रांनी आणि नियतकालिकांनी रंगभूमी नियतकालिकाची दखल घेतलेली नाही असे दिसते. संपादकांनी याबाबतची खंत व्यक्त केलेली आहे.

Hazlitt चा एक विचार छापला आहे.

''The stage not only refines the manners, but it is the best teacher of morals, for it is the truest and most intelligible picture of life"

श्री. शंकरराव मुजुमदार यांच्या मनात आधीपासूनच नाटकाच्या सामर्थ्याविषयीचे, उन्नतीविषयीचे विचार कसे घोळत होते ते यावरून दिसते. तत्कालीन विचारवंतांच्या मुजुमदारांकडून काही अपेक्षा होत्या. याच पुस्तकात सुरुवातीला, काही अभिप्राय छापलेले आहेत. त्यात न. चिं. केळकर यांचा अभिप्राय आहे. त्यात श्री. केळकर म्हणतात - ('नाटक कसे पहावे १९०२, पृ. तीन)

' माझ्या मते नाट्यविषयक चर्चा करण्यास एक मासिक पुस्तक पाहिजे आहे व ते काढण्यास किर्लोस्कर मंडळीस आपण उत्तेजन देऊन इतर कित्येक बाबींप्रमाणे नाट्यविषयक वाङमय उत्पन्न करण्याचे कामी पुढाकार घेण्याचे श्रेय सदर मंडळीस आपण मिळवून द्याल अशी आशा आहे. '

या अपेक्षा, श्री. शं. बा. मुजुमदार यांनी रंगभूमी नियतकालिकाद्वारे किती प्रमाणात पूर्ण केल्या ते तपासणे हा अभ्यासविषय ठरतो ते यामुळेच

प्रकरण पहिले
संदर्भ टीपा

(१) अर्वाचीन चरित्रकोश - इ. स. १८१८ ते १९४५ - सिद्धेश्वरशास्त्री चित्राव - पृ. ५०२-५०३ यामध्ये रंगभूमी नियतकालिकाचा कालखंड १९०५ ते १९१७ असा दिला आहे तो चुकीचा आहे.

(२) श्रीशंकर - मंगलाचरण - हे सहा कडव्यांचे आहे -

वसंततिलका

रं कापरी धरि कपाल करी सुरेश
गं गा शिरी; दहनभूमिनिवासि हौस ।

भू ताधिपा रूचतसे नररूंडमाला
मि थ्या करी लघुगुरूत्व नमी तयाला ।१।।

(३) हा उल्लेख प्लेगच्या साथीचा आहे. रंगभूमीच्या वर्ष २ रे, अंक १ला, ऑगस्ट १९०८ या अंकात संपादकांनी

वर्गणीदारांना विनंती केली आहे की पुण्यातील ज्या वर्गणीदारांनी प्लेगमुळे आपले पत्ते बदलले असतील त्यांनी ते कळविण्याची मेहेरबानी करावी.

(४) प्रमुख पात्राचा हा उल्लेख नटवर्य केशवराव भोसले यांचा आहे.

(५) ब्रिटिश सरकारने १९१० साली वृत्तपत्रांवर बंदी आणणारा प्रेस ॲक्ट पास केला होता. त्यामुळे खूप वृत्तपत्रे बंद
पडली. हा वृत्तपत्रांवर वाईट परिणाम झाला.

(६) मराठी नाट्यसमीक्षा - १८६५ ते १९३५ डॉ. रा. शं. वाळिंबे, पुणे विद्यापीठ प्रकाशन १९६८, पृष्ठ १७१